**आर.सी.सी. क्र.५१/२०२१** **निशाणी क्र.२९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१**

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – ज्ञानेश्वर रामदास कापकर,

वय – ३० वर्षे, कामधंदा – शेती,

रा. – शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

**सरतपास**

**अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. एस. दराडे यांचेकडून –**

०१. मी आरोपींना ओळखतो. आरोपी क्र.०१ हा माझे चुलते, आरोपी क्र०२ हा माझा चुलत भाऊ आहे, तर आरोपी क्र.०३ ही माझी चुलती आहे. ते सर्व आज न्यायालयात उपस्थित आहेत. घटना सुमारे चार वर्षांपूर्वी रात्री ९.०० चे सुमारास आमच्या घरासमोर घडली. माझे आरोपींसोबत शेतीच्या वाटपाचे कारणावरुन किरकोळ वाद झाले होते. वाद झाल्याने तेथे लोकांची गर्दी जमा झाली होती. सदर गर्दीमध्ये कोणी कशाने मारहाण केली हे मला कळाले नाही. त्यानंतर मी शेवगाव पोलीस ठाणे येथे येऊन फिर्याद दिली. त्यानंतर मी सरकारी दवाखाना, शेवगाव येथे जाऊन उपचार घेतले. या व्यतिरिक्त काही घडले नाही. आता मला माझी फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. परंतु, मला फिर्याद मधील मजकुर आठवत नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासणीची परवाणगी मागीतली, परवाणी देण्यात आली.)**

०२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.०१ ने मला गजाने व आरोपी क्र. ०२ व ०३ यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली. साक्षीदारास फिर्याद मधील अधोरेखांकित भाग–'अ' वाचून दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद मधील अधोरेखांकित भाग–अ हा पोलीसांनी माझ्या सांगण्यावरुन लिहुन घेतला होता व तो खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमची व आरोपींची आपसात तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष दिली.

**उलटतपास आरोपींचे विधिज्ञ श्री. एम. व्ही. थोरात वकिल यांनी नाकारला.**

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत,

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.02.14 13:39:24 +0530

दिनांक:– १४/०२/२०२६

(वैशाली स. मोरे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र.०२), शेवगाव.